पुरोगामी विचाराचे
# एकमत
संस्थापक : विलासराव देशमुख

▶बेंद ओढ्यासंदर्भात सामंजस्य करार ▶रितू छाब्रिया यांचे प्रतिपादन

# उपेक्षितांच्या गरजपूर्तीसाठी मुकुल माधव फाऊंडेशनची स्थापना

**प्रतिनिधी/कन्हेरगाव**

फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या संचालिका व मुकुल माधव फाऊंडेशनच्या कार्यकारी संचालिका रितू छाब्रिया यांनी माढा वेल्फेअर फाऊंडेशन यांच्याशी बेंद ओढ्यासंदर्भात सोमवारी ५० लाख रुपयांचा सामंजस्य करार सामाजिक उत्तरदायित्वाच्या योजनेंतर्गत केला.




याप्रसंगी उपस्थित मान्यवर व प्रकल्प लाभार्थी, नागरिकांना, महिलांना, सर्व घटकांना संबोधित करताना त्यांनी विचार व्यक्त करताना म्हणाल्या की, जो कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचा केंद्र शासनाचा २००२ चा कायदा आला त्याआधीच स्वयंप्रेरणेने मुकुल माधव फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकीची भावना जोपासण्याचे अनेक विविध उपक्रम हाती घेऊन ते यशस्वीपणे राबविलेले आपणास दिसून येतात.

याठिकाणी मुकुल माधव फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया आणि सहसंस्थापक प्रकाश छाब्रिया यांनी आदर्श अशी कार्यपद्धती ठरवलेली असून त्याची अतिशय आदर्श पद्धतीने अंमलबजावणी आजपर्यंत केलेली दिसून येत आहे. पाणी या प्रश्नावर आजपर्यंत मोठे काम शासनाकडून आणि इतर घटकांकडून झालेली असून मुळात हा प्रश्न लोकसमुदायामुळे जो निर्माण झाला आहे, या प्रश्नाची सोडवणूक लोक चळवळीतूनच झाली पाहिजे, असे माझे मत असून या प्रश्नाला सोडविण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक संस्था सहभागी झाली पाहिजे. गेल्या चार वर्षापासून मुकुल माधव फाऊंडेशनद्वारे पुणे, रत्नागिरी, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये जलसंवर्धनाचे भरीव काम केलेले आहे.

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब हा साठवला गेला पाहिजे व जमिनीमध्ये मुरविला गेला पाहिजे, यावर भरपूर काम आपणाला करावयाचे आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन हे आरोग्य, शिक्षण, महिला सबलीकरण आणि जलसंवर्धन यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. मुकुल माधव फाऊंडेशनच्या कार्यपद्धतीमध्ये समाजातून आलेल्या अर्जांची आणि अपिलाची ४८ तासात निर्गती हा अविभाज्य भाग असून त्यासाठीची आधुनिक तंत्रज्ञानाची मदत ही प्रमुख गोष्ट आहे .

माढा वेल्फेअर फाऊंडेशन या संस्थेबरोबर झालेल्या करारामध्ये सर्व तपशिलांचा तसेच प्रकल्पामुळे समाजाच्या होणाऱ्या फायद्याचा उल्लेख आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल मधव फौऊंडेशन सामाजिक उपयोगाच्या आणि गरजानुरूप बाबींवर आगामी काळातसुद्धा भरीव योगदान देणार आहे.

याप्रसंगी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, नाम फाऊंडेशनचे मकरंद अनासपुरे, आमदार बबनराव शिंदे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष संजयमामा शिंदे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर राजेंद्र भारुड, जिल्हा परिषदेचे वित्त व लेखा अधिकारी महेश अवताडे, जिल्हा नियोजन अधिकारी सर्जेराव दराडे, माढा तालुक्याचे तहसीलदार सदाशिव पडदुणे, गटविकास अधिकारी महेश सुळे आदींसह माढा वेल्फेअरचे युवराज शिंदे, वाय. जी. भोसले, विलास गुटाळ, राहुल वरपे, आनंद पाणबुडे, महेश डोके, लक्ष्मण वरपे, अमर शहा, तोहित सय्यद, महेश मारकड, केशव आवटे उपस्थित होते.

▶ माढा वेल्फेअर फाऊंडेशनच्या संकेतस्थळाचे उद्घाटन रितू छाब्रिया यांनी केले. संकेतस्थळाची रचना आणि निर्मिती करताना मूळचे निमगाव (टें.) गावचे सुपुत्र, धनराज दादांचे चुलत बंधू आणि सध्या अमेरिकेत संगणक अभियंता म्हणून कार्यरत असलेले अजिंक्य विकास शिंदे यांनी गेली ५५ दिवसांपासून रोज आपल्या दिनक्रमातील काही तास यासाठी परिश्रम केलेले आहेत. संकेतस्थळाची निर्मिती होताना त्या संकेतस्थळाचा वापर थेट तळागाळातील आणि सर्वसामान्य शेतकरी, महिला, विद्यार्थ्यांना होण्यासाठी ज्या आवश्यक तंत्रज्ञान सुलभ करण्याच्या बाबी वापरता येतील, त्या सर्वांचा यामध्ये अंतर्भाव असेल, अशी रचना केलेली आहे.

# उपेक्षितांच्या गरजपूर्तीसाठी मुकुल माधव फाऊंडेशनची स्थापना : रितुजी छाब्रीया

**मुकुल माधव फाऊंडेशन,फिनोलेक्स इंडस्ट्रीज, माढा वेल्फेअर फाउंडेशन नाम फाउंडेशन व जिल्हा परिषद यांचेशी बेंद ओढयायासंदर्भात सामंजस्य करार**




टेंभुर्णी,दि. १३ (प्रतिनिधी) फिनोलेक्स इंडस्ट्रीज च्या संचालिका व मुकुल माधव फाऊंडेशनच्या कार्यकारी संचालिका माननीय रितू छाब्रिया यांनी माढा वेल्फेअर फाउंडेशन यांचेशी बेंद ओढयासंदर्भात सोमवारी ५० लाख रुपयांचा सामंजस्य करार सामाजिक उत्तरदायित्वाच्या योजने अंतर्गत केला याप्रसंगी उपस्थित मान्यवर व प्रकल्प लाभार्थी गावातील नागरिकांना महिलांना सर्व घटकांना संबोधित करताना त्यांनी विचार व्यक्त करताना म्हणाल्या की जो कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचा केंद्र शासनाचा २००२ चा कायदा आला त्याआधीच स्वयंप्रेरणेने मुकुल माधव फाउंडेशनने सामाजिक बांधिलकीची भावना जोपासण्याचे अनेक विविध उपक्रम हाती घेऊन ते यशस्वीपणे राबवलेले आपणास दिसून येतात.

या ठिकाणी मुकुल माधव फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया आणि सहसंस्थापक प्रकाश छाब्रिया यांनी आदर्श अशी कार्यपद्धती ठरवलेली असून त्याची अतिशय आदर्श पद्धतीने अंमलबजावणी आजपर्यंत केलेली दिसून येत आहे. पाणी या प्रश्नावर आज पर्यंत मोठे काम शासनाकडून आणि इतर घटकांकडून झालेली असून मुळात हा प्रश्न लोकसमुदाय यामुळे जी निर्माण झाला आहे या प्रश्नाची सोडवणूक लोक चळवळीतूनच झाली पाहिजे असे माझे मत असून या प्रश्नाला सोडवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक संस्था सहभागी झाली पाहिजे गेली चार वर्षापासून मुकुल माधव फाऊंडेशन द्वारे पुणे, रत्नागिरी ,सांगली, सातारा ,सोलापूर या जिल्ह्यामध्ये जलसंवर्धनाचे भरीव काम केलेले आहे.

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब हा साठवला गेला पाहिजे व जमिनीमध्ये मुरविला गेला पाहिजे यावर भरपूर काम आपणाला करावयाचे आहे .फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन हे आरोग्य, शिक्षण ,महिला सबलीकरण आणि जलसंवर्धन यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे .मुकुल माधव फाऊंडेशनच्या कार्यपद्धतीमध्ये समाजातून आलेल्या अर्जांची आणि अपिलाची ४८ तासात निर्गती हा अविभाज्य भाग भाग असून त्यासाठीची आधुनिक तंत्रज्ञानाची मदत ही प्रमुख गोष्ट आहे .माढा वेल्फेअर फाउंडेशन या संस्थेबरोबर झालेल्या करारामध्ये सर्व तपशिलांचा तसेच प्रकल्पामुळे समाजाच्या होणाऱ्या फायद्याचा उल्लेख आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल मधव फौंडेशन सामाजिक उपयोगाच्या आणि गरजानुरूप बाबींवर आगामी काळात सुद्धा भरीव योगदान देणार आहे

याप्रसंगी पालक मंत्री विजयकुमार देशमुख नाम फाउंडेशन चे मकरंद अनासपुरे आमदार बबनराव शिंदे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष संजय मामा शिंदे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर राजेंद्र भारूड जिल्हा परिषदेचे वित्त व लेखा अधिकारी महेश अवताडे जिल्हा नियोजन अधिकारी सर्जेराव दराडे माढा तालुक्याचे तहसीलदार सदाशिव पडदुणे गटविकास अधिकारी महेश सुळे आदींसह माढा वेल्फेअर चे युवराज शिंदे ,वाय जी भोसले , विलास गुटाळ, राहुल वरपे आनंद पाणबुडे ,महेश डोके, लक्ष्मण वरपे अमर शहा तोहित सय्यद ,महेश मारकड, केशव आवटे उपस्थित होते.

माढा वेल्फेअर फाउंडेशन च्या संकेतस्थळाचे उद्धघाटन रितू छाब्रिया यांनी केले. संकेतस्थळाची रचना आणि निर्मिती करताना मूळचे निमगाव(टे.) गावचे सुपुत्र, धनराज दादांचे चुलत बंधू आणि सध्या अमेरिकेत संगणक अभियंता म्हणून कार्यरत असलेले अजिंक्य विकास शिंदे यांनी गेली ५५ दिवसापासून रोज आपल्या दिनक्रमातील काही तास यासाठी परिश्रम केलेले आहेत .संकेत स्थळाची निर्मिती होताना त्या संकेतस्थळाचा वापर थेट तळागळातील आणि सर्वसामान्य शेतकरी ,महिला ,विद्यार्थी यांना होणेसाठी ज्या आवश्यक तंत्रज्ञान सुलभ करण्याच्या बाबी वापरता येतील, त्या सर्वांचा यामध्ये अंतर्भाव असेल, अशी रचना केलेली आहे.